महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM






RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – १२४ ■ शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४


# जिल्हा नियोजन अधिकारी यांची सुरगाणा तालुक्यातील 'स्वप्नातील गाव' प्रकल्पास सदिच्छा भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा): सुरगाणा तालुक्यातील कोटोंबी आणि भाटी या गावांना जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. स्वदेश फाउंडेशनच्या माध्यमातून येथे साकारण्यात आलेल्या 'स्वप्नातील गाव' या प्रकल्पांची त्यांनी माहिती घेत, ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत यतीन सोनार उपस्थित होते.





यावेळी 'स्वप्नातील गाव' या प्रकल्पासह स्वदेस फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करून जिल्हा नियोजन अधिकारी श्री. शिंदे यानी माहिती घेतली. 'स्वप्नातील गाव' हा एक ग्रामीण विकास प्रकल्प आहे, जो स्वदेस फाउंडेशन द्वारे राबविण्यात आहे. या प्रकल्पांतर्गत गावांना स्वच्छ, सुंदर, स्वस्थ, सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. यात वैयक्तिक शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, आरोग्य सेवा, शिक्षण, उपजीविकेच्या संधी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधांचा विकास केला जातो. दुग्ध व्यवसाय, शेळीपालन, फळबाग लागवड आणि कुक्कुटपालन यांसारख्या प्रकल्पांद्वारे ग्रामस्थांचे उत्पन्न वाढविण्यासाठी सहकार्य केले जाते.



# मतदानासाठी शासकीय व खासगी आस्थापनांना मिळणार दोन तासांची सवलत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्ह्यातील इगतपुरी, नांदगाव, त्रिंबक, येवला, सिन्नर, सटाणा, चांदवड, भगुर, ओझर, पिंपळगाव बसवंत व मनमाड ११ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला असून २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे.

त्यामुळे मतदानासाठी या ११ नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी स्थानिक पूर्ण दिवसाची सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याचे राज्य निवडणूक आयोगाकडील ४ नोव्हेबर २०२५ रोजीचा आदेशात नमूद आहे.

त्यानुसार मतदानासाठी २ तासांची सवलत देण्याचे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी निर्गमित केले आहे. मतदान करण्यासाठीची सवलत उद्योग, उर्जा व कामगार विभागात येणाऱ्या आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहील.

असे जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी आदेशात म्हटले आहे.

## ज्योतीराव ..

अन्याय हो कुणावर
येते तात तुझी सय
महात्मा क्रांती सूर्या
केलेस तूचि निर्भय

अनुयायी तव आम्ही
अंधाराला वाटे भय
अज्ञानाच्या असूराची
आता नाही मुळी गय

गुढरुढी न् परंपरांची
हळूहळू जाय सवय
जन्मतुझा सत्कारणी
थोपवूनि धरी प्रलय

तूच शिकविले सार्थ
शिकायला नसे वय
तुम्हांमुळे जाहले रे
पिढी सारी सुखमय

अनेक गुणांची खाण
जाणीवेचे संग्रहालय
क्रांतीज्योती पत्नीचे
भोवताली तव वलय

सार्थ सहचारिणी ती
जनसेवेत दोघे तन्मय
सुवर्णाक्षरी नोंद होई
आठवणी काढे समय

**– हेमंत मुसरीफ पुणे**

# आदिवासी वसतिगृहात संविधान दिन उत्साहात साजरा


## संविधान अभ्यासाने माणूस सक्षम प्रगल्भ बनतो - पोनि विनोद पाटील



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड – संविधान अभ्यासानेच माणूस सक्षम प्रगल्भ बनतो.असे प्रतिपादन पोलीस निरिक्षक विनोद पाटील यांनी संविधान दिनानिमित्त आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह सुरगाणा येथे आयोजित जागर संविधानाचा या कार्यक्रमात मार्गदर्शन प्रसंगी केले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अभय तायडे होते.प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक विनोद पाटील, वक्ते रतन चौधरी,गृहपाल प्रज्ञा सकपाळ तायडे, ए.जी.काळे,

आदी मान्यवर उपस्थित होते. पाटील म्हणाले की,संविधानाने मिळालेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता,बंधुता या समान न्यायामुळेच मी या पदावर पोहचलो आहे.जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रजासत्ताक देशात जगातील सर्वात मोठे संविधान भारतात आहे. हे संविधान म्हणजे सर्व ग्रंथामध्ये सुंदर असा मौल्यवान राष्ट्रग्रंथ आहे.याचा प्रत्येक घरोघरी प्रचार व प्रसार करण्याची सर्वस्वी जबाबदारी हि आजच्या शिकलेल्या तरुण युवकांची आहे.एक महिला शिकली तर सर्वांना शहाणे करून सोडते म्हणून मुलींनी शिक्षणाची कास धरली पाहिजे. यावेळी संविधानाची प्रत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अंजली वाडेकर या विद्यार्थिनीने संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. वक्ते चौधरी यांनी संविधानाची रचना, मूलतत्त्वे, वैशिष्ट्ये, घटना दुरुस्ती, संविधानाची आवश्यकता, संविधानाने मिळालेले अधिकार, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, राष्ट्रीय एकता, एकात्मता या विषया विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.या प्रसंगी टी.सी. चौधरी, गोकुळ माळी, व्ही.डी. पगार,एस. जी.पाटील, मोहन जमाले, एस.पी.वायकर,पी. डी. पाटील, पी.आर.कनोजे, एकनाथ पेटार, टी.एस.चौधरी, अपर्ण मावची, राधिका वसावे, सिमरन वसावे, चिंतामण चौधरी, कैलास गायकवाड, प्रमिला हाडस आदींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी हिने केले.

# भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याकरिता मंत्री शंभूराज देसाई यांना निवेदन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

रमेश लांजेवार, नागपूर - महाराष्ट्रातील कलाल कलार समाजाच्या उन्नतीसाठी सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.याच अनुषंगाने दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ ला शिवसेना नेते आणि राज्याचे मंत्री श्री शंभूराज देसाई यांना महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

यावेळी निवेदनाच्या माध्यमातून त्यांना विनंती करण्यात आली की, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना गेल्या चार वर्षांपासून समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे या उद्देशाने प्रयत्नशील आहे.परंतु सरकारने कलाल-कलार समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत अजुनपर्यंत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.याकरिता संघटनेच्या माध्यमातून शिवसेना नेते आणि राज्याचे मंत्री श्री शंभूराज देसाई यांना विनंती करण्यात आली की, शिवसेनेच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या उद्देशाने आपण प्रयत्न करावे अशी विनंती निवेदनाच्या माध्यमातून शिवसेना नेते श्री शंभूराज देसाई यांना करण्यात आली. त्याचप्रमाणे समाजाला पारंपरिक मद्य व्यवसाय देण्यात यावा व लाडवाणी शाखेला कलाल २५४ मध्ये समाविष्ट करण्यात यावे इत्यादी विविध मागण्यांच्या संदर्भात निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने आपण सरकारच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून द्यावा अशी समाजाच्या वतीने माननीय मंत्री महोदयांकडे मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार,राज्य प्रवक्ता रमेश लांजेवार, सरचिटणीस संतोष खंबलवार, कार्याध्यक्ष रविंद्र हटवार प्रामुख्याने उपस्थित होते.

# संविधान चौकात संविधान दिन व संविधान जागर सप्ताह समापन सोहळा उत्साहात संपन्न

## संविधान मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था बळकट करण्याचा निर्धार






**दै. आवाज वृत्तसेवा...**

सुरेश जगताप / उल्हासनगर : उल्हासनगर - संविधान चौक, फुले शाहू आंबेडकर विचारमंच, जयभीम स्तंभ महिला मंडळ आणि मानवता अभियान सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही संविधान जागर सप्ताह समारोह व संविधान दिन भव्य, शिस्तबद्ध आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाच्या उपक्रमाला निर्मिती फाउंडेशन, पुणे आणि BARTI संस्थेचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रमुख आयोजन संविधान चौक फुले शाहू आंबेडकर विचारमंच यांनी केले होते.

या सोहळ्यास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सिद्धार्थ मोरे, डॉ. अवंतिका मुंदे, संयोजक व सामाजिक कार्यकर्त्या निवेदिता जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. नगर-सेवक प्रमोदजी टाले होते.कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करून झाली आणि उप-स्थित सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत भेट देऊन सन्मानित करण्यात आले. मानवता अभियान संस्थेच्या अध्यक्षा निवेदिता जाधव यांनी संविधान जागर सप्ताहाची संपूर्ण माहिती आढावा स्वरूपात सादर केली तसेच भारतीय संविधान व महिला मुक्ती या विषयावर प्रभावी विचार मांडले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. सिद्धार्थ मोरे यांनी सोप्या भाषेत संविधानाचा इतिहास, तत्व-ज्ञान आणि त्याची आजची गरज याचे सविस्तर विश्लेषण करून उपस्थितांची मने जिंकली. तर डॉ. अवंतिका मुंदे यांनी संविधान आणि महिलांचे आरोग्य या संदर्भात माहितीपूर्ण व परिणामकारक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार सुरेश जगताप यांनी केले तर सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रा. विकास जाधव यांनी अतिशय प्रभावीपणे पार पाडली. समारोप प्रसंगी अध्यक्ष मा. प्रमोदजी टाले यांनी सर्व वक्त्यांच्या विचारांना एकत्रित करत भारतीय संविधानातील मूल्यांचे महत्त्व व रक्षणाची गरज अध-रेखित करत आयोजकांचे आभार मानले. या वेळी मानव अधिकार परिषद, डॉ. आंबेडकर फोर्स, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, पत्रकार, सखी सन्मान मंच महिला मंडळ, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संविधान चौक फुले शाहू आंबेडकर विचारमंच यांच्या राजेंद्र भालेराव, यशवंत रणश-वरे, हेमाडे साहेब, पाखरे साहेब, शेगोकार साहेब, मुकेश आडके, पंकज मगर, हरीश गुंजाळ, डॉ. शेजव आणि सिद्धार्थ आराख यांनी मोलाचे सहकार्य केले. तर जयभीम स्तंभ महिला मंडळ यांच्यातील शालिनी शेजूळ, उज्वला उबाळे, वैशाली रणशिवरे, पुष्पा शेगोकार आणि शिला आराख यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

१६ ते २६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेला संविधान जागर सप्ताह व संविधान दिन सोहळा संविधान रक्षणाचा संदेश देत प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# सोमपुर येथे अभ्यासिकेचे उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी :- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत सोमपुर येथे अभ्यासिकेचे उद्घाटन सदर अभियानात ग्रामपंचायत सोमपुर गावाने सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमांतर्गत पाच कोटींचे बक्षीस मिळण्याचा मानस घेऊन या अभियाना अंतर्गत जिल्हा परिषद शाळा सोमपुर येथे अभ्यासिका लोक वर्गणीतून सुरुवात करण्यात आली त्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती मान्यवर उप-स्थित होते यात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार साहेब. जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन महेश पाटील साहेब, गट विकास अधिकारी पंचायत समिती बागलाण अतुल पाटील साहेब सोमपुर ग्रामपंचायत सरपंच सौ क्रान्ती भामरे. सोमपूर ग्रामपंचायत अधिकारी कैलास राठोड भाऊसाहेब सर्व सदस्य कार्यकारणी व मान्यवर ,ग्रामस्थ उपस्थित होते.



# भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक - दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी अशरफी सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक संस्थेच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अशरफी सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट नाशिक ऑफिस सारडा सर्कल इगतपुरी चाळ इथे बौद्ध मुस्लिम बांधवानी आणि संविधानवादी नागरिकांनी संविधान दिन उत्साहात साजरा केला. तरी भारतीय राज्य घटनेचे थोर शिल्पकार विश्वरत्न -डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व संविधान वंदन करून मुख्यालयाच्या ऑफिस मध्ये सर्व बौद्ध मुस्लिम बांधवांनी आणि संविधानवादी नागरिकांनी उपस्थित राहून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष - फिरोज हाजी शब्बीर खान,- उपाध्यक्ष - सुनिल गो-




विंदराव निकाळे, सरचिटणीस - भारद्वाज यादवराव पगारे, खजिनदार - नावेद जावेद शेख, सदस्य - मनिष तिवडे, शाहबाज शेख, हाशिम खान,नंदकुमार निकाळे अनवर पठाण, अरबाज शेख, मोहसिन शेख, सुफियान काझी, आसिफ शहा, समिर शेख, एजश शेख, आवेज शेख, रज़ा कुरेशी, आसिफ शेख,आमिन खान, रूसतम पठाण, बौद्ध मुस्लिम बांधवांनी आणि संविधानवादी नागरिकांनी संविधान दिनाचे महत्त्व, भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये आणि लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकांची भूमिका याबाबत मार्गदर्शन भाषणे करण्यात आली.

संविधानातील मूल्य आचरण्यात आणण्याचे प्रत्येक नागरिकाचे जबाबदारी आहे सर्वांनी भारत देशात एकोप्याने राह-वे. संविधानाचे हे ती मूल्य डोळ्यासमोर ठेवून स्वातंत्र्य समता बंधुता आदर्श प्रत्येक नागरिकाने जपले पाहिजे जाती जातींमध्ये तेढ निर्माण न होता सर्वांनी गुण्या गोविंदाने राहिले पाहिजे असे आवाहन करण्यात आले.

# राज्यस्तरीय काव्य संमेलन पुरस्कार सोहळा संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - सुप्रसिद्ध कवी तसेच नवोदित कवींनी महफिल सुमधुर करून आपल्या भावभावना वास्तविक जगताशी समरस केल्या. कवींच्या कवितेतील भावविश्व रसिकांना मंत्रमुग्ध करून गेले. असे निष्ठावान कवी या काव्य संमेलनास लाभले, हेच या काव्य संमेलनाचे विशेष.भोजन तर अगदी रुचकर आणि चवदार असेच या नियोजित वेळेत कार्यक्रम 'वंदे मातरम' गायनाने संपन्न झाला.यशवंतराव महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या यशवंत नगरीत सत्यायन शिवकारी साहित्य मंच बागलाण आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा व काव्य संमेलन अतिशय सुंदर रित्या व नियोजनबद्ध संपन्न झाले.या कार्यक्रमात अश्विनी सांगळे यांना स्व-गत अध्यक्ष हे पद देण्यात आले होते. त्यावेळी त्यांना सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमात समाजातील विविध स्तरावरील कर्तुत्ववान व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाला प्रेरणा देण्यासाठी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.




# विंचूरला श्री खंडेराव महाराज यात्रोत्सव भंडाऱ्याची उधळण करत जल्लोषात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (प्रतिनिधी) : श्रीखंडेराव महाराज चंपाषष्ठी यात्रा उत्सव येथे मोठ्या जल्लोषात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. भंडाऱ्याची उधळण करत आणि खंडेरावाचा जयघोष करत बारा गाड्या ओढण्यात आल्या यावेळी भक्तांची मांदियाळी पाहायला मिळाली.

विंचूर येथे दरवर्षी चंपाषष्ठी निमित्त खंडेराव महाराज यात्रा उत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. बुधवारी सकाळी ८.३० वाजता काकड आरती,९.३० वाजता मांडव डहाळे आणण्याचा कार्यक्रम,१० वाजता कावड यात्रा तर ११ वाजता खाणे बोन्याची फेरी हा कार्यक्रम संपन्न झाला. दुपारी दोन वाजता बारा गाड्या ओढणारा नवरदेव सुनील सोनवणे यांची गावातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी भंडाऱ्याची मुक्त उधळण संपूर्ण विंचूर शहरात करण्यात आली.खंडेराव महाराज मंदिर परिसरात सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास फटाक्यांची आतषबाजी तसेच भंडाऱ्याची मुक्त उधळण करत बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी भक्तांनी खंडेराव महाराज यांचा जयघोष करत यात्रेचा आनंद लुटला. मोठ्या संख्येने खंडेराव महाराज भक्तगण तसेच गावकरी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मताशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांचा 'महात्मा फुले समता' पुरस्काराने होणार गौरव

## आज समता भूमी, महात्मा फुले स्मारक पुणे येथे होणार 'समता पुरस्काराचे' वितरण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई,पुणे,नाशिक,दि.२६नोव्हेंबर:- अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथीच्या दिवशी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिला जाणारा 'समता पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना देण्यात येणार आहे. या पुरस्करामध्ये रुपये एक लक्ष, फुले पगडी, मानपत्र शाल आणि स्मृतीचिन्ह यांचा समावेश आहे. सदर पुरस्कार शुक्रवार, दि.२८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता समता भूमी, फुले वाडा, पुणे येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष बापू भुजबळ, महिला अध्यक्षा मंजिरी धाडगे, पुणे विभागीय अध्यक्ष प्रीतेश गवळी, शहर अध्यक्ष पंढरीनाथ बनकर, महिला शहर अध्यक्ष वैष्णवी सातव यांनी पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ, विधान परिषदेचे आमदार पंकज भुजबळ, कार्याध्यक्ष तथा माजी खासदार समीर भुजबळ यांच्यासह सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच समता परिषदेचे पदाधिकारी व राज्यभरातून समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दरवर्षी महात्मा फुले पुण्यतिथी समता दिनाच्या निमित्ताने 'महात्मा फुले समता पुरस्कार' सामाजिक, राजकीय, साहित्य, पत्रकारिता यासारख्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना देण्यात येतो. या अगोदर माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरदचंद्र पवार, माजी केंद्रीय मंत्री विरप्पा मोईली, खा.शरद यादव, छत्तीसगढ माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, ज्येष्ठ विचारवंत प्रा.रावसाहेब कसबे, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, ज्येष्ठ लेखक डॉ.भालचंद्र नेमाडे, डॉ.बी.एल.मुणगेकर, लेखिका अरुंधती रॉय, ज्येष्ठ विचारवंत प्रा.हरी नरके, प्रा.डॉ.मा.गो.माळी, ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो, ज्येष्ठ कवी समीक्षक यशवंत मनोहर, डॉ. तात्याराव लहाने, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते नागराज मंजुळे यांच्यासह अनेक दिग्गजांचा समता पुरस्काराने गौरव करण्यात आलेला आहे.

यंदाच्या वर्षी या पुरस्कारासाठी ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय सामाजिक-आर्थिक विचारविश्वात मोलाची छाप सोडणारे अर्थशास्त्रज्ञ, शिक्षक, अभ्यासक आणि धोरणनिर्माते म्हणून डॉ. सुखदेव थोरात यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. सामाजिक न्याय, आर्थिक समानता आणि शिक्षण सर्वांसाठी खुले करण्याच्या दिशेने त्यांनी केलेल्या कार्याची देशव्यापी दखल घेतली गेली आहे. डॉ.थोरात यांनी सन २००६ ते २०११ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. उच्च शिक्षणाच्या लोकशाहीकरणावर भर देत त्यांनी प्रवेश, शिष्यवृत्ती, मागास समाजातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती यासाठी अनेक धोरणे राबवली. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चचे अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डॅलिट स्टडीजचे संस्थापक संचालक पद भूषवित सामाजिक भेदभाव, जातीय विषमता आणि गरीबीवरील संशोधनाला त्यांनी नवा आयाम दिला. डॉ. थोरात यांच्या संशोधनाचा पाया हा सामाजिक न्याय व आर्थिक समता आहे. दलित-मागासवर्गीय समाजावरील आर्थिक भेदभाव, ग्रामीण विकास, कृषी अर्थशास्त्र, शिक्षणातील विषमता, गरिबी व सामाजिक बहिष्करण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक पातळीपर्यंत मर्यादित नसून धोरणनिर्मात्यांना दिशा देणारे ठरले आहे. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाच्या मान्यतेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री सन्मान प्रदान केला. देश-विदेशातील अनेक विद्यापीठांकडून त्यांना सन्माननीय पदव्या, पुरस्कार आणि विशेष गौरवांनी सन्मानित करण्यात आले आहे. अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून पुढे येत आंतरराष्ट्रीय दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञ बनलेले डॉ. सुखदेव थोरात हे आजच्या भारतासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. सामाजिक न्याय, समान संधी आणि मानवतावादी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था घडविण्याची त्यांची धडपड अजूनही सुरूच आहे. त्यांनी आपल्या कार्यातून महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचा सामाजिक वारसा विकसित केला. त्यांनी केलेल्या अलौकिक कार्याची दखल घेत त्यांना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सन २०२५ चा मानाचा 'समता पुरस्कार' देऊन गौरविण्यात येत आहे.

या समता पुरस्कार सोहळ्यास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असून सर्व फुले प्रेमी, समता सैनिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नमो उद्यान ठरणार येवल्याचे आकर्षण

## १ कोटीच्या निधीतून साकारणार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

येवला,दि.२७ नोव्हेंबर:- पैठणी, शिवसृष्टी, मुक्तीभूमीनंतर आता नमो उद्यान येवल्याचे आकर्षण ठरणार आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पना आणि नेतृत्वात हे उद्यान विकसीत केले जाणार आहे. या उद्यानासाठी राज्य सरकारने १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून लवकरच त्याचे काम सुरू होणार आहे.

येवला शहरातील नागरिकांना एक उत्कृष्ट दर्जाचे मनोरंजन केंद्र निर्माण व्हावे म्हणून नमो उद्यान साकारले जाईल, असे महायुतीच्या वचननाम्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. नमो उद्यानात लहान मुलांसाठी खेळणी, वयोवृद्धांसाठी चालण्याचे मार्ग, आकर्षक बागा व पाण्याचे फवारे बसविण्यात येणार आहेत.

दर्जेदार उद्यान, हरित परिसर, विश्रांती व फिरण्यासाठी सुविधा या उद्यानात उपलब्ध होईल. हरित वातावरण, आरोग्यदायी जीवनशैली व मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने येवला शहरवासियांना मोठा फायदा होईल. निसर्ग, संस्कृती, आरोग्य आणि आधुनिक सुविधा यांचा सुंदर समन्वय असलेले नमो उद्यान आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास आमदार पंकज भुजबळ यांनी व्यक्त केला आहे.



येवला शहरात नमो उद्यान साकारण्याचे आम्ही निश्चित केले आहे. या प्रकल्पासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. येवला शहर परिसरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे उत्तम ठिकाण ते असेल. हे उद्यान येवल्याची ओळख व्हावी असा आमचा प्रयत्न आहे.
- पंकज भुजबळ, आमदार

नमो उद्यानासाठी सध्या जागेची निश्चिती केली जात आहे. किमान ५ एकर परिसरावर हे उद्यान साकारण्याचे नियोजन केले जात आहे. नामांकीत वास्तुविशारदाकडून या उद्यानाचे प्रतिरूप तयार केले जाईल. या उद्यानासाठी आणखी निधी उपलब्ध करून देण्याचेही नियोजन सुरु आहे. त्यामुळे नाशिक जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात हे उद्यान वैशिष्ट्यपूर्ण ठरेल, असा प्रयत्न असल्याचे पंकज भुजबळ यांनी सांगितले आहे.

**नमो उद्यानाची वैशिष्ट्ये-**

अत्याधुनिक जॉगिंग ट्रॅक - आकर्षक ग्रेनाइट, कॉबेल स्टोन, नैसर्गिक रेड क्ले ब्रिक्स, डेकोरेटिव स्ट्रीट लाइट्स व स्पीकर प्रणाली
ग्रीन जिम - खुल्या हवेत व्यायाम करण्यासाठी महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र जिम.
लहान मुलांसाठी किड्स प्ले एरिया
बालकांच्या सुरक्षिततेसाठी ईपीडीएम फ्लोअरिंग



रोलर हॉकी ग्राऊंड
बास्केटबॉल आणि टेनिसकोर्ट्स
उच्च गुणवत्ता पॉलीयुरेथेन फ्लोरिंग
योग आणि ध्यानझोन - शांत व हिरवळीत विसाव्याची जागा
बांबूची पक्षी घरटी - चिमण्या व विविध पक्ष्यांसाठी नैसर्गिक निवासस्थाने
रेनवॉटर हार्वेस्टिंग
अम्फीथिएटर
शिल्पकलेचे विविध नमुने
ओपन ऑडिटोरियम
सुरक्षित आणि आधुनिक व्यवस्था
सोलर लाइट्स
पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत कंपोस्ट युनिट

# लासलगाव ते पिंपळगाव रस्त्यासाठी ४५ कोटी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि.२७ नोव्हेंबर :- राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी आणि वाहतुकीसाठी महत्वाचा असलेल्या लासलगाव ते पिंपळगाव या रस्त्याच्या सुधारणेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

निफाड, येवला, मनमाड, नांदगाव तालुक्यातील नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना पर्यायी मार्ग म्हणून लासलगाव व पिंपळगाव रस्त्याचे मजबुतीकरण करून रास्याची सुधारणा करण्याची मागणी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली होती. त्यानुसार या रस्त्याच्या सुधारण्यासाठी प्रशाकीय मान्यता देण्यात आली असून त्यासाठी ४५ कोटी रुपयांच्या निधी मंजूर करण्यात आला आहे. लवकरच या कामाला सुरुवात करण्यात येऊन मार्च २०२७ अखेर या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

पिंपळगाव पालखेड लासलगाव हा २९ किलोमीटरचा रस्ता आहे. हा रस्ता त्रंबकेश्वर, दिंडोरी, निफाड व नांदगाव (मनमाड) तालुक्यांना जोडणारा राज्य मार्ग आहे. सदर रस्त्यावर पिंपळगाव व लासलगाव कृ.उ.बाजार समिती आहे. तसेच लासलगाव व मनमाड रेल्वे स्टेशन आहे. सदर कामामुळे लासलगाव रेल्वे स्टेशन ते पिंपळगाव (राष्ट्रीय महामार्ग) जोडला जाणार असुन आपतकालीन परिस्थिती मध्ये मनमाड, लासलगाव स्टेशन ते पिंपळगाव (राष्ट्रीय महामार्ग) यांना जोडणारा पर्यायी राज्य मार्ग आहे.

तसेच हा रस्ता दिंडोरी तालुक्यातून त्रंबकेश्वरला जोडणारा महत्वाचा राज्य मार्ग आहे. लासलगाव शहरामधुन गुजरात हद्द सावळदे छडवेल सटाणा चांदवड लासलगाव विंचुर सावळिविहीर (शिर्डी) रस्ता (रामा क्र.७) हा जात असुन गुजरात राज्यातील शिर्डीला जाण्या-या भाविकांची मोठी वर्दळ असते. तसेच सदर रस्त्यावर लासलगाव कांदा मार्केट असुन सिंहस्थ काळामध्ये कांदा वाहतुकीचा काळ असल्याने सदर वाहतूक सुरळीत होणेसाठी सदर रस्ता अतिशय महत्वाचा ठरणार आहे.

लासलगाव ते पिंपळगाव हा रस्ता लासलगाव कोटमगाव चौफुली ते कृषी उत्पन्न बाजार समिती लासलगाव पर्यंत १० मीटर रुंदीचा काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या ठिकाणाहून पुढे सारोळे खु. पर्यंत ७ मीटर रुंद काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. तर सारोळे खुर्द ते लोनवाडी पर्यंत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्याच्या कामामुळे शेतकरी व इतर प्रवाश्यांना दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहे.

वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात,
जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री,
उद्घाटन सोहळा जाहिरात
तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा
सवलतीच्या दरात
* संपर्क *
९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४

# संविधान दिनानिमित्त पंडित दीनदयाळ रोजगार मेळावा व विशेष मार्गदर्शन शिबीर संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, (जिमाका वृत्तसेवा):* जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योगकता मार्गदर्शन केंद्र, नाशिक, मॉडल करिअर सेंटर, नाशिक आणि महात्मा गांधी विद्यामंदीर, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने एम.जी.व्हि.एस कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स नाशिक येथे संविधान दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व के.बी.एच डेंटल कॉलेज व हॉस्पिटल, हिरे नॉलेज पार्क, पंचवटी नाशिक येथे स्पर्धा परीक्षेची तयारी व व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले. यावेळी एकूण २६५ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मेळाव्यात ३३२ उमेदवारांची सहभाग नोंदविला यापैकी १७४ उमेदवारांनी मुलाखती दिल्या व ८४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. अशी माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहाय्यक आयुक्त विजय रिसे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. आयोजित रोजगार मेळावा व मार्गदर्शन सत्र कार्यक्रमात कौशल्य विकास अधिकारी सागर मोहिते, मिलिंद देशपांडे, महात्मा गांधी विद्यामंदिर ट्रस्टचे समन्वयक अपुर्व हिरे, ट्रस्टी डॉ.बी.एस. जगदाळे, विद्यामंदिरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बी.एस.यादव, ड भगवान येलमामे, करिअर कांउन्सलर ण्ड मोटिव्हेशन स्पिकर आसिफ शेख, विवेकांनद करिअर अकॅडमीचे संचालक विक्रांत बोरसे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते विशेष मार्गदर्शन सत्र व रोजगार मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले व मार्गदर्शन करण्यात आले. मेळाव्यात आरती एज्युकेटर, सुमॅगो इन्फोटेक प्रा.लि., युवाशक्ती स्कील इंडिया प्रा.लि., कम्पास ग्रुप इंडिया प्रा.लि या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.





# शासन सेवेतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षेचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, (जिमाका वृत्तसेवा): शासनाच्या वित्त विभागांतर्गत संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत लेखा विषयक काम करणारे लिपिकवर्गीय (वर्ग ३) कर्मचाऱ्यांसाठी ११ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट- क सेवा विभागीय परीक्षा (भाग १ व २) २०२५ ही माहे डिसेंबर २०२५ मध्ये प्रस्तावित आहे. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, अहिल्यानगर व नंदुरबार येथील पात्र इच्छुक कर्मचाऱ्यांचे अर्ज कार्यालय प्रमुखांनी १२ डिसेंबर २०२५ पर्यंत सहसंचालक, लेखा व कोशागारे, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन सहसंचालक, लेखा व कोशागारे, नाशिक विभाग, नाशिक बाबुलाल पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

या परीक्षेचे परिपत्रक https://mahakosh.maharashtra.gov.in च्या employee corner मधील Exams Tab आणि DAT (mahakosh.in) च्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे. इच्छुक कर्मचाऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज ५ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखांकडे सादर करावयाचे आहेत. व कार्यालय प्रमुखांनी प्राप्त कर्मचाऱ्यांचे अर्ज छाननी करून सहसंचालक, लेखा व कोशागारे, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे १२ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळ संपेपर्यंत पाठवावेत, असेही सहसंचालक श्री. पाटील यांनी कळविले आहे.

# संविधान अमृत महोत्सवानिमित्त ‘घर घर संविधान’ कार्यक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा):* भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. भारतीय संविधानास ७५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान हा कार्यक्रम सामाजिक न्याय भवन, नाशिक येथे संपन्न झाला.

यावेळी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त राकेश पाटील, समाज कल्याण नाशिक सहाय्यक आयुक्त हर्षदा बडगुजर, जिल्हा जात पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी योगेश पाटील, लेखाधिकारी मुकेश पाटील, विश्वास सोळस, प्रमिला काठे, चेतन महाले उपस्थित होते.

सामाजिक न्याय भवन, नाशिक येथील आवारातील भारतीय संविधानाच्या कोनशिलेस समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ यांनी पुष्पहार अर्पण केला. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच संविधान दिनाबाबत महत्व सांगणारे पथनाट्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सोळस यांनी केले.








# नगरपरिषद निवडणूकः १ व २ डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर : जिल्हाधिकारी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, दि. २७ नोव्हेंबर, २०२५ (जिमाका वृत्तसेवा):* राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. या कार्यक्रमानुसार मतदान प्रक्रिया २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजेपासून सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होणार आहे. या निवडणूकीसाठी मतदान केंद्रांवर नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांनी मतदान साहित्य घेवून मतदानाच्या एक दिवस आगोदर १ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रावर पूर्व तयारीसाठी पोहचावयाचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इगतपुरी, नांदगाव, त्रिंबक, येवला, सिन्नर, सटाणा, चांदवड, भगुर, ओझर, पिंपळगाव बसवंत व मनमाड या ११ नगरपरिषद क्षेत्रातील मतदान केंद्र असलेल्या परिसरातील संबंधित शाळा/ विद्यालय/ महाविद्यालय यांना सोमवार १ डिसेंबर व मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी निर्गमित केले आहे.

# महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव : येथील नूतन विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे, उपप्राचार्य डॉ. सोमनाथ आरोटे व प्रमुख वक्ते प्रा.वाल्मिक आरोटे यांच्या हस्ते घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व भारताच्या संविधानाच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक प्रा.उज्वल शेलार, प्रा.किशोर गोसावी, सैन्य दलात कुपवाडा येथे कार्यरत असलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी किसन गांगुर्डे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.प्रदीप सोनवणे, डॉ.संजय शिंदे, प्रा.देवेंद्र भांडे, प्रा.सुनिल गायकर आणि उच्च माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात पोस्टर्स स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले. पोस्टर्स स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.



प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा.वाल्मिक आरोटे यांनी भारतीय संविधान दिनाविषयी आपले मनोगत करताना राष्ट्राच्या उभारणीसाठी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्ययुद्धासाठी लढणाऱ्या नेत्यांचे आणि क्रांतिकारकांचे स्मरण केले आणि २६/११ च्या हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहिली. तसेच भारताच्या धर्मनिरपेक्ष संविधानाचे स्मरण करून त्यांनी सर्वांना संविधानाची तत्वे आणि उद्देश आत्मसात करण्याचे आवाहन केले. यानंतर सर्व शिक्षक-प्राध्यापक व विद्यार्थी यांनी राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे, उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. विद्यार्थ्यांना ही उद्देशिका कळावी यासाठी वाचन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांनी केला. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना प्रत्येक भारतीय नागरिकाने संविधानाप्रती आदर आणि निष्ठा ठेऊन वागले पाहिजे. घटनेतील तत्वाप्रमाणे वागलो तर निश्चितच देशाचा व्यवहार चोख होईल. राज्यघटना ही एक जिवंत दस्ताऐवज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रा.प्रभाकर गांगुर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुनिल गायकर यांनी केले तर आभार प्रा.देवेंद्र भांडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे जनरल सेक्रेटरी श्री.गोविंदराव होळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी श्री.देवेंद्र भांडे, श्री.सुनिल गायकर आणि रा.से.यो. स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील एन.एस.एस. व एन.सी.सी. चे विद्यार्थी आणि उच्च माध्यमिक विभागातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालेगाव येथील सामान्य रुग्णालयाच्या परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय सामान्य रुग्णालय, मालेगाव, जि. नाशिक येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता सामान्य परिचारिका प्रसविका जिएनएम ३ वर्ष व स्त्री सहाय्यकारी प्रसविका ए एन एम -२ वर्ष प्रशिक्षणासाठी (अनियमित बॅच ) प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर प्रक्रियेतील जी एन एम रिक्त जागा (कोटा ) करिता महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१०+२) १२वी विज्ञान व ए एन एम रिक्त जागा (कोटा )करिता महाराष्ट्र राज्य उच्चं माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१०+२) १२ वी विज्ञान / वाणिज्य / कला शाखेतून ४५ % गुणांसह उत्तीर्ण असलेल्या फक्त ए. एन. एम. प्रशिक्षणा करिता महिला उमेदवारांकडून तसेच जि एन एम प्रशिक्षणाकरिता महिला व पुरुष उमेदवांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. दिनांक २७/११/२०२५ पासून ते २८/११/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत अर्ज विक्री व दिनांक २७/११/२०२५ ते दि. २९/११/२०२५ रोजी अर्ज स्वीकृती केली जाणार आहे. तरी गरजू विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. योगेश पाटील यांनी केले आहे.